# महाराष्ट्र शासन

क्रमांक : आस्था-२०२३/प्र.क्र.१६८/का-१
आदिवासी विकास विभाग
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दूरध्वनी क्र.०२२-२२७९३०३१
दिनांक : २२ सप्टेंबर, २०२५

प्रति,

पुरवठादार

**विषय :-आदिवासी विकास विभाग (खुद्द) करीता ११ महिन्याच्या कालावधीसाठी बाह्ययंत्रणेव्दारे वाहनचालक पुरविण्यासाठी कोटेशन पाठविण्याबाबत..**

महोदय,

आदिवासी विकास विभाग (खुद्द) करीता वाहनचालकांची २ पदे करार पध्दतीने भरण्याबाबतचे खालील तपशीलानुसारचे कोटेशन कृपया त्वरीत पाठवावे, ही विनंती.

| निविदाकाराचे नाव | दोन वाहनचालकांचा प्रतिमाह दर | सर्विस चार्जेस | अतिकालिक भत्ता | मुंबई/बृहन्मुंबई (मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हद्दी) बाहेरील भत्ता | वाहनचालकास रात्री १०.०० वाजल्यानंतर थांबावे लागल्यास जेवण भत्ता | वाहनचालकास रात्री ११.०० वाजल्यानंतर थांबावे लागल्यास प्रवास भत्ता |
|---|---|---|---|---|---|---|
| | रु.२६६११ x २ = रु. ५३२२२ | रु. | रु.४० प्रति तास* | रु.३०० | रु.१५० | रु.२०० |

*अतिकालीक भत्ता हा दिवसाच्या कामाचे ९ तास झाल्यानंतर १ तासांनतर म्हणजेच १० तास पुर्ण झाल्यावर लागू होईल.

तरी उपरोक्त बाब विचारात घेऊन वाहनचालकांची २ पदे करार पध्दतीने भरण्याबाबत मोहारबंद लिफाफ्यामध्ये इच्छुक पुरवठादारांकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत. याबाबतच्या अटी व शर्ती पुढीलप्रमाणे आहेत :-

१) मोहोरबंद लिफाफ्यामध्ये सह सचिव (का-१), आदिवासी विकास विभाग, विस्तार इमारत, पहिला मजला, रु. नं.१३१, मंत्रालय, मुंबई येथे दि.२९.०९.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यत जमा करावीत. दरपत्रके त्याच दिवशी दुपारी ०२.१५ वाजता सह सचिव (आस्थापना) यांचे दालन आदिवासी विकास विभाग, विस्तार इमारत, पहिला मजला, रु.नं.१३१, मंत्रालय, मुंबई येथे उघडण्यात येतील. तसेच कोणतेही दरपत्रक स्विकारण्याचा तसेच सर्वच दरपत्रके नाकारण्याचा हक्क या कार्यालयाचे विभागप्रमुख राखुन ठेवत आहेत.



Scanned with OKEN Scanner

२) मोहारबंद लिफाफ्यावर "आदिवासी विकास विभाग (खुद्द) करीता वाहनचालकांची २ पदे करार पध्दतीने भरणे" असे स्पष्टपणे लिहिणे आवश्यक आहे. लिफाफ्यावर दुरध्वनी क्रमांक व ई-मेल, पत्ता नमुद असावा.

३) दरपत्रकासोबत पुरवठादार कंपनीने १) पॅन कार्ड, २) जी.एस.टी. नोंदणी प्रमाणपत्र, ३) दुकाने व संस्था अधिनियम १९४८ प्रमाणपत्र किंवा ई-उद्योग आधार प्रमाणपत्र, इत्यादी छायांकित प्रती जोडणे आवश्यक आहे.

४) एका पुरवठादारास एकच दरपत्रक सादर करता येईल.

५) दरपत्रक फॉर्मवर दरपत्रक धारकाची सही व शिक्का असणे बंधनकारक आहे.

६) दरपत्रक मंजुर झाल्यास खालील प्रमाणे अटी शर्ती बंधनकारक असतील व त्याप्रमाणे सेवापुरवठादारास करारनामा करावा लागेल.

**करारनामा :-**

१. सदर पदांची नेमणूक ही पूर्णत: कंत्राटी पध्दतीची असेल.

२. या पदावरील कर्मचारी यांना शासकीय कर्मचारी म्हणून गणले जाणार नाही.

३. सदर दर दिनांक / /२०२५ ते / /२०२६ या ११ महिन्याच्या कालावधीसाठी लागू राहतील.

४. वाहनचालक भारतीय नागरिक असावा तसेच तो किमान दहावी उतीर्ण असावा. त्यास मराठी लिहिता/ वाचता/बोलता येणे आवश्यक राहील.

५. सेवापुरवठादारातर्फे पुरविण्यात येणारा वाहनचालक गुन्हेगारी पार्श्वभूमीचा किंवा प्रवृतीचा नसावा.

६. वाहनचालकासोबत त्याचा वाहन चालविण्याचा परवाना, त्याचे ओळखपत्र (आधारकार्ड, निवडणूक कार्ड, पॅनकार्ड इत्यादीपैकी एक) त्याच्याजवळ असणे आवश्यक आहे व त्याची झेरॉक्स प्रत विभागास सादर करणे आवश्यक राहील.

७. वाहनचालकांची पोलीस तपासणी अहवाल देणे सेवापुरवठादारास बंधनकारक राहिल.

८. वाहनचालकाने वर्दीवर असताना नशापान/धुम्रपान व तंबाखुजन्य पदार्थाचे सेवन करू नये.

९. वाहनास अपघात झाल्यास व दुर्दैवाने वाहनचालकास गंभीर स्वरुपात इजा झाल्यास वाहनचालकास वैद्यकीय खर्चाची अथवा नुकसान भरपाईचे कोणतेही दायित्व शासनाकडे असणार नाही. त्याची जबाबदारी संबंधित सेवापुरठादारावर राहिल.

१०. कंपनी / संस्थेतर्फे काम करणाऱ्या वाहनचालकाच्या सेवेचे कोणतेही उत्तरदायित्व शासनावर राहणार नाही.

११. वाहनचालकाचे किमान वय १८ वर्षे आणि कमाल वय ५० वर्षापेक्षा जास्त नसावे.

१२. आदिवासी विकास विभागाच्या आवश्यतेनुसार वाहनचालकाची मागणी केली जाईल.

१३. वाहनचालकास साप्ताहिक सुट्टी रविवारची राहील. तसेच त्याला रविवारी सुट्टीच्या दिवशी कामावर बोलविल्यास त्या दिवसाकरिता मासिक ठोक दराच्या सरासरीने प्रतिदिन दराने वेतन अनुज्ञेय राहील.

१४. वाहनचालकाच्या रजा कालावधीत पर्यायी वाहनचालक उपलब्ध करून देण्याची जबाबदारी सेवापुरवठादाराची राहील. पर्यायी वाहनचालकाच्या मोबदल्याचे देयक सादर केल्यानंतर ते शासनाकडून अदा करण्यात येईल.

१५. सेवापुरवठादाराने कंत्राटी कर्मचारी पुरविल्यानंतर त्यांच्याबाबतचा मोबदला हा मासिक तत्वावर सेवापुरवठादाराने दुहेरी प्रतीमध्ये एक रुपयाचा स्टॅम्प देयकाला लावावा. तसेच पुरविलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांचे हजेरीपत्रक सादर केल्यानंतर ३० दिवसांच्या आत देयक सेवापुरवठारास देण्यात येईल. कंत्राटी कर्मचाऱ्यांचा पुरवठा करण्यासाठी तसेच मोबदला देण्यास कोणत्याही कारणास्तव उशीर झाला तर त्यावर कोणतेही व्याज अनुज्ञेय राहणार नाही.



Scanned with OKEN Scanner

१६. पुरविण्यात आलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्याचे काम समाधानकारक नसल्याचे निदर्शनास आल्यास, त्याऐवजी पर्यायी कर्मचारी तात्काळ उपलब्ध करून देण्याची जबाबदारी सेवापुरवठादाराची राहील.

१७. पुरविण्यात आलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांनी कामाच्या ठिकाणी कार्यालयाची सुरक्षा, गोपनियता, वर्तवणूक, राजशिष्टाचार आदीबाबतच्या नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील.

१८. सेवापुरवठादाराने पुरविण्यात आलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांबाबत कोणत्याही प्रकारचे कायद्याचे उल्लंघन झाल्यास त्याबाबतची संपूर्ण जबाबदारी ही सेवापुरवठादाराची राहील व त्याअनुषंगाने झालेली कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई ही सेवापुरवठादाराला भरावी लागेल.

१९. सेवापुरवठादाराच्या व त्याने पुरविलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्याच्या निष्काळजीपणामुळे विभागातील कर्मचाऱ्यांच्या तसेच शासनाच्या वाहनाची कोणत्याही प्रकारची हानी पोहचल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी सेवापुरवठादाराची राहील. तसेच शासनाच्या वाहनाची काळजी व उपसाधनांची काळजी व देखभाल करणे आवश्यक आहे.

२०. आयकर अधिनियमाप्रमाणे सेवापुरवठादाराच्या देयकातून आयकराची वजावट करण्यात येईल.

२१. बाह्ययंत्रणेव्दारे काम करून घेणाऱ्या सेवापुरवठादाराने शासनाचे निर्धारित केलेल्या वेतन दराप्रमाणे वेतन व वेळोवेळी लागू असलेले कर व अनुज्ञेय भत्ते अदा करणे बंधनकारक राहील. सेवापुरवठादाराकडून उपलब्ध करून दिलेल्या मनुष्यबळाला देय असलेल्या कायदेशीर दायित्व संबंधित प्राधिकरणाकडे जमा करण्याची जबाबदारी सेवापुरवठादाराची राहील.

२२. कराराचे पालन समाधानकारक न झाल्यास करारनामा केव्हाही संपुष्टात आणणे तसेच कराराची मुदत वाढविणे याबाबतचा अंतिम निर्णय आदिवासी विकास विभागाचा राहील.

२३. सेवापुरवठादारास दरकरार संपुष्टात आणावयाचा झाल्यास आगाऊ तीन महिन्याची नोटीस देणे बंधनकारक राहील.

२४. करारातील अटी व शर्ती मान्य असल्याबाबत व विहित वेळेत वाहनचालक पुरविण्याबाबत रु.५००/- स्टॅम्प पेपरवर करारनामा करून देणे आवश्यक आहे.

(शैला मिठबावकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :- निवडनस्ती

प्रति,

कक्ष अधिकारी /अवर सचिव, संगणक कक्ष, आदिवासी विकास, मंत्रालय, मुंबई

यांना विनंती करण्यात येते की, सदर दरपत्रकाची जाहिरात विभागाच्या संकेतस्थळावर अपलोड करण्यात यावी.



Scanned with OKEN Scanner